“लातूर जिल्ह्यातील नवबौद्ध जातीच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास” (इ.स.2010-2020)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विज्ञान विद्याशाखेतील 'अर्थशास्त्र' विषयातील पीएच्.डी.
पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा
संक्षिप्त आराखडा

संशोधक

सुमित शिवाजी सोनकांबळे

एम.ए., बी.एड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ. चंद्रशेखर जरासंध देशमुख

एम.ए., नेट, पीएच.डी.,
अर्थशास्त्र विभाग
शिवाजी महाविद्यालय, उदगीर
ता.उदगीर जि.लातूर.

संशोधन केंद्र

शिवाजी महाविद्यालय, उदगीर,
जि.लातूर (महाराष्ट्र)

ऑगस्ट - 2023

“लातूर जिल्ह्यातील नवबौद्ध जातीच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास” (इ.स.2010-2020)

- **प्रस्तावना :**

भारतीय समाजात जवळपास 8000 जाती आढळून येतात. भारतीय समाजव्यवस्थेत बऱ्याच प्रमाणात कालांतराने बदल घडून आलेले असले तरी जातीचे समूळ उच्चाटन झालेले दिसून येत नाही. भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जातीसाठी आरक्षणासारख्या विशेष तरतुदी दिसून येतात. अनुसूचित जाती (Schedule Caste) हा शब्दप्रयोग भारत सरकारच्या 1935 च्या कायद्यान्वये करण्यात आला. अनुसूचित जातींना दलित किंवा अतिशूद्र असेही संबोधले जाते. जनगणना सुरू झाल्यापासून त्यांना शेड्यूल्ड कास्ट असे नाव देण्यात आले. कालांतराने तो अनुसूचित जातीतील सर्वच जातींसाठी वापरला जाऊ लागला. अनुसूचित जातीत 59 जातींचा समावेश आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडरांनी सर्वच शोषित, उपेक्षित, अस्पृश्य जातींसाठी मोलाचे कार्य केले आहे. समाजातील जातीय उतरंड पाहून समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 1956 साली हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धम्माचा स्वीकार केला. त्यानुसार पूर्वाश्रमीच्या महार जातीने आंबेडकरांसोबत मोठ्या प्रमाणात धर्मांतर केले. त्यामुळे ही जात नवबौद्ध झाली. अशी नवबौद्ध समाजाची पार्श्वभूमी दिसून येते.

- **विषय निवड :**

लातूर जिल्हा मराठवाडा विभागातील 08 जिल्ह्यापैकी महत्त्वाचा जिल्हा आहे. हा जिल्हा कर्नाटक, तेलंगणा राज्याच्या सीमावर्ती भागावर वसलेला आहे. लातूर जिल्ह्यात लातूर, उदगीर, औसा, निलंगा, चाकूर, देवणी, जळकोट, शिरुर अनंतपाळ, रेणापूर व अहमदपूर या दहा तालुक्यांचा समावेश आहे. सन 2011 च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या 57,488 एवढी

असलेली दिसून येते. प्रस्तुत संशोधनासाठी नवबौद्ध जातीची निवड करण्यात आली असून ही जात लातूर जिल्हयात मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहे. त्यामुळे नवबौद्ध जातीची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

- **संशोधन विषयाचे महत्त्व**

जातीसंदर्भाने अनेक विचारवंतांनी, लेखकांनी, संशोधकांनी आपली मते मांडली असून विविध अंगाने अभ्यास करण्यात आलेला आहे. मात्र नवबौद्ध जातीची सामाजिक स्थिती अभ्यासण्याचा प्रयत्न अल्प प्रमाणात झालेला दिसून येतो. लातूर जिल्हयात अनुसूचित जातीची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे लातूर लोकसभा मतदारसंघ आणि जिल्हयातील उदगीर मतदारसंघ हे अनुसूचित जातीसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातीच्या 480,913 एकूण लोकसंख्येतील पुरुषांचे प्रमाण 247,918 एवढे असून स्त्रियांचे प्रमाण 232,995 एवढे असलेले दिसून येते. लातूर जिल्हयात अनुसूचित जातीतील नवबौद्ध समाजाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती खालावलेली दिसून येते. त्यामुळे लातूर जिल्हयातील नवबौद्ध जातीचे अध्ययन करणे गरजेचे ठरते. प्रस्तुत अभ्यासातून सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर प्रकाश टाकण्यात येईल.

- **उद्दिष्ट्ये :**

वरील घटक विचारात घेऊन लातूर जिल्हयातील नवबौद्ध जातीचा अभ्यास करण्यासाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित केलेली आहेत.

1) नवबौद्ध जातीची विविध घटकांच्या आधारे सामाजिक परिस्थिती अभ्यासणे.

2) नवबौद्ध जातीची विविध घटकांच्या आधारे आर्थिक परिस्थिती अभ्यासणे.

3) नवबौद्ध जातीच्या प्रगतीतील अडथळ्यांचा अभ्यास करणे.

4) नवबौद्ध जातीची प्रगतीसाठी उपाययोजना सुचविणे.

- **गृहितके :**

1) नवबौद्ध जातीची सामाजिक स्थिती इतर जातीच्या तुलनेत दयनीय आहे.

2) लातूर जिल्ह्यातील नवबौद्ध जातीची आर्थिक परिस्थिती खालावलेली आहे. पण शासकीय नोकरीतील प्रमाण वाढत आहे.

3) आर्थिक व औद्योगिक विकासात नवबौद्ध जातीचे प्रमाण अत्यल्प आहे.

- **आकडेवारीचे संकलन :**

प्रस्तुत संशोधनातील माहिती संकलनाकरिता तयार करण्यात येणारी मुलाखत, अनुसूची, लातूर जिल्ह्यातील नवबौद्ध समाजातील उत्तरदात्यांकडून भरून घेतल्यानंतर सदर मुलाखत अनुसूचीची पूर्व तपासणी करून प्रश्नावलीचे मूल्यांकन करण्यात येईल. माहिती संकलित प्रक्रियेनंतर माहिती अंतिम रूप देताना संकलित माहिती योग्य पद्धतीने प्रक्रिया करून गुणात्मक व संख्यात्मक माहिती वेगळी करून माहितीचे विश्लेषण करण्यात येईल.

- **अभ्यास पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधनाच्या वर्णनात्मक, विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात येणार असून प्राथमिक स्रोतात मुलाखत अनुसूचीद्वारे माहिती संकलित करण्यात येईल. माहिती विश्लेषण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांना अंतिम रूप देण्यासाठी वर्गीकरण, सांकेतिकरण, सारणी व आलेख, इत्यादींचा उपयोग करण्यात येईल.

द्वितीय स्रोतांमध्ये विविध संदर्भ ग्रंथ, शोधप्रबंध, शासकीय योजना, शासकीय प्रकाशित अहवाल, मासिके, इंटरनेट इत्यादींचा वापर करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनासाठी लातूर जिल्हयातील 10 तालुक्यातील अनुसूचित जातीतील निवडक नवबौद्ध जातीतील लोकांची मुलाखत अनुसूचीद्वारे माहिती संकलित करून त्याचे विश्लेषण करणे ही व्याप्ती सांगता येईल.

मर्यादा :

प्रस्तुत संशोधन लातूर जिल्हयातील अनुसूचित जातीतील नवबौद्ध जातीच्या सामाजिक व आर्थिक स्थितीपुरते व लातूर जिल्हयापुरते मर्यादित आहे. ही संशोधनाची मर्यादा आहे.

- **प्रकरण योजना**

प्रस्तुत संशोधनाची विभागणी एकूण पाच प्रकरणात करण्यात येणार असून ती पुढीलप्रमाणे आहे.

प्रकरण पहिले - संकल्पनात्मक आराखडा

प्रकरण दुसरे - लातूर जिल्हयाची ओळख

प्रकरण तिसरे - नवबौद्ध जातीची सामाजिक स्थिती

प्रकरण चौथे - नवबौद्ध जातीची आर्थिक स्थिती

प्रकरण पाचवे - नवबौद्ध जातीसाठीच्या शासकीय योजना

प्रकरण सहावे - निष्कर्ष व उपाययोजना

शेवटी संदर्भ ग्रंथ सूची व परिशिष्ट्ये जोडण्यात येतील.

संदर्भ ग्रंथ सूची

1) आगलावे प्रदीप, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर, 2000

2) दा.धो. काचोळे, सामाजिक संशोधन पद्धती, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 1993

3) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र राज्य

4) सोमनाथ रोडे-मराठवाड्याचा इतिहास, विद्या प्रकाशन

5) भारतीय जनगणना अहवाल 2001 व 2011

6) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2010 ते 2020

7) www.indianculture.gov.in

8) https://govtofmaharashtra.gov.in

9) latur.gov.in

संशोधक

सुमित शिवाजी सोनकांबळे

एम.ए., बी.एड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ. चंद्रशेखर जरासंध देशमुख

एम.ए., नेट, पीएच.डी.

अर्थशास्त्र विभाग

शिवाजी महाविद्यालय, उदगीर

ता.उदगीर जि.लातूर